


# भ्रष्टाचार निर्मूलन

अलीकडे भ्रष्टाचाराचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. विशेषतः गेल्या दोन वर्षांत सीडब्ल्यूजी म्हणजेच कॉमनवेल्थ क्रीडा स्पर्धांच्या आयोजनातील आर्थिक घोटाळा, टू जी स्पेक्ट्रम वाटपातील घोटाळा, आदर्श हौसिंग घोटाळा, कोळशाच्या खाणीवाटपातील कोलगेट घोटाळा असे मोठे आर्थिक घोटाळे समोर आल्यामुळे भ्रष्टाचाराच्या विरोधात वातावरण तापलं आहे. त्याचबरोबर विदेशी बँकामध्ये काळा पैसा ठेवलेल्यांची नावं जाहीर करावीत या मागणीनेही जोर धरला आहे. एकीकडे लोककल्याणाच्या कामावर खर्च करण्यासाठी सरकारकडे पैसा नाही अशी स्थिती आहे आणि दुसरीकडे घोटाळ्याचे मोठे-मोठे आकडे दिसत आहेत. पंचवीस वर्षांपूर्वी बोफोर्स तोफा खरेदी मधील घोटाळा समोर आला होता. त्या भ्रष्टाचाराचा आकडा होता ६४ कोटी रुपये, आज टूजी स्पेक्ट्रम घोटाळ्याने काही लाख कोटी रुपयांचा पल्ला गाठला आहे. भ्रष्टाचाराच्या या कोटीच्या कोटी उड्डाणांमुळे जनतेत अस्वस्थता आहे. या अस्वस्थतेचं प्रतिबिंब २०११ मध्ये श्री. अण्णा हजारे यांनी दिल्लीमध्ये आरंभलेल्या उपोषणातून निर्माण झालेल्या उत्स्फूर्त आंदोलनांतून उमटलं. लाखो लोक या आंदोलनात स्वयंप्रेरणेने सामील झाले होते. जनलोकपालाच्या मागणीचं हे आंदोलन पुढे निस्तेज झालं, परंतु पुन्हा एकदा श्री. अण्णा हजारेंच्या उपोषणाने हे जनलोकपाल बिल मंजूर झाले.

या आंदोलनाच्या निमित्ताने भ्रष्टाचाराच्या बद्दल लोकांच्या मनात किती प्रक्षोभ आहे, हे समोर आलं. तरीसुद्धा भ्रष्टाचार निर्मूलनाकरिता सरकारकडून, शासकीय यंत्रणांकडून ठोस पावलं उचलली गेली नाहीत. राजकीय पक्ष, सरकार, शासकीय यंत्रणा या प्रश्नांबाबत किती उदासीन आहेत, हेच यातून दिसतं. देशातील सर्वसामान्य माणूस दररोज या ना त्या प्रकारे भ्रष्टाचाराच्या जात्यात भरडून निघत आहे, पण याचं कोणालाही सोयरसुतक नाही. हे चित्र कसं बदलणार? कधी बदलणार? खरोखरच भ्रष्टाचार निर्मूलन ही अशक्यप्राय गोष्ट आहे?

## भ्रष्टाचार निर्मूलन

१) महाराष्ट्रात भ्रष्टाचारात आघाडीवरील विभाग

भ्रष्टाचार विरोधी पथकाने २०१२ या वर्षात हाताळलेली भ्रष्टाचाराची प्रकरणे

| | | |
|---|---|---|
| १) पोलीस दल | १२७ प्रकरणं | १६७ व्यक्ती |
| २) महसूल | ९४ प्रकरणं | ११८ व्यक्ती |
| ३) एम.एस.ई.बी. | २३ प्रकरणं | ३० व्यक्ती |
| ४) जमीन नोंदी | २२ प्रकरणं | २५ व्यक्ती |
| ५) वन विभाग | १३ प्रकरणं | १८ व्यक्ती |
| ६) सार्वजनिक आरोग्य | १५ प्रकरणं | १८ व्यक्ती |
| ७) इतर विभाग | १९५ प्रकरणं | २५७ व्यक्ती |

- भ्रष्टाचार विरोधी प्रयत्नांमध्ये आघाडीवर असलेली राज्ये : सन २०१० च्या भ्रष्टाचार विरोधी निर्देशांकानुसार (पश्चिम बंगाल, आसाम, ओरिसा, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र)

'ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनल'च्या २०१२ च्या अहवालानुसार भ्रष्टाचार निर्देशांकांमध्ये १७६ देशांत भारताचा ९४ वा क्रमांक आहे. या यादीनुसार सर्वात कमी निर्देशांक असलेला देश, म्हणजेच सर्वांत कमी भ्रष्टाचार असलेला देश पहिल्या स्थानावर असतो. तर सर्वांत अधिक निर्देशांक असलेला देश, म्हणजेच सर्वांत जास्त भ्रष्टाचार असलेला देश शेवटच्या क्रमांकावर असतो.

डेन्मार्क, न्यूझीलंड अशा काही देशांमध्ये भ्रष्टाचाराचं प्रमाण जवळपास शून्य आहे. त्यामुळे हे देश वरच्या स्थानांमध्ये आहेत; तर भारतात भ्रष्टाचाराचं प्रमाण

अधिक असल्याने भारत खालच्या स्थानांमध्ये आहे. या क्रमवारीत भारत वरच्या स्थानांमध्ये दिसेल याची काहीच शक्यता नाही काय? भारतातील भ्रष्टाचार व भ्रष्टाचार विरोधी प्रयत्नांच्या बाबतीतील सद्य:स्थिती चिंता वाढवणारी आहे.


मूळात भ्रष्टाचार म्हणजे काय, ते आपण पाहू. कोणत्याही मोठ्या घोटाळ्यांची चर्चा न करता, भ्रष्टाचाराची सुरुवात अगदी सामान्य स्तरावर, व्यक्तीच्या पातळीवर कशी होते, ते पाहा. उदाहरणार्थ, एखादी गोष्ट हवी आहे आणि ती मिळवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याऐवजी, ती सहजासहजी कशी मिळेल याचा विचार जेव्हा माणूस करू लागतो. तेव्हा तो प्रथम मनाने भ्रष्टाचारी होतो व नंतर कृतीने होतो. उदाहरणार्थ, मला सिनेमा पाहायचा आहे, पण त्यासाठी रांगेत उभे राहून तिकीट घेण्याऐवजी मी काळाबाजार करणाऱ्यांकडून ते तिकीट विकत घेतो; हा भ्रष्टाचार आहे, याची कदाचित मला जाणीव असते किंवा नसतेही. साध्या साध्या गोष्टीत आपण कसा भ्रष्टाचार करतो हे तुम्ही जर दैनंदिन जीवनातील अशी उदाहरणं शोधत गेलात, तर तुमच्या सहज लक्षात येईल. माणसाच्या दैनंदीन गरजा ज्यांना आपण मूलभूत गरजा म्हणतो, त्या जर मिळत नसतील तर त्यासाठी माणूस बरे-वाईट सगळे प्रयत्न करणार , हे स्वाभाविक आहे. तो कोणाच्या डोक्यावर पाय देईल; किंवा कोणाच्या पायात पाय घालेल. एखाद्याच्या हातातील भाकरी हिसकावून घेणं हा सुद्धा भ्रष्टाचार आहे.

माणसाच्या मूलभूत गरजा भागणं महत्त्वाचं असतं, पण अशा मूलभूत गरजा भागलेल्या असतानाही माणूस भ्रष्टाचारी का होतो? याचं उत्तर माणसाची 'हाव' हे आहे. समजा, माणसाचं घर एका खोलीचं असेल तर तो म्हणतो मला दोन खोल्यांचं घर पाहिजे, दोन खोल्यांचं घर असेल तर तो म्हणतो चार खोल्यांचं घर मिळालं पाहिजे. त्याला परिधान करण्यासाठी दोन कपडे पुरेसे असतील तर तो म्हणेल मला दहा कपडे पाहिजेत. माणसाच्या गरजा वाढतच जातात, विस्तारत जातात आणि मग भ्रष्टाचाराला सुरुवात होते. अर्थशास्त्राचं पायाभूत तत्त्व असं सांगतं की, माणसाच्या इच्छा अमर्याद असतात आणि त्यांच्या पूर्तीची साधनं मर्यादित असतात. अमर्याद इच्छा आणि मर्यादित साधनं या असमतोलातून अर्थशास्त्र जसा जन्म घेतं, तसाच भ्रष्टाचाराचाही जन्म होतो.

माणसाच्या बेसिक नीड्स पूर्ण झाल्या तर तो कम्फर्ट झोनमध्ये जातो, कम्फर्ट

नीड्सही पूर्ण झाल्या तर, तर तो लक्झरी झोनमध्ये जातो. त्याच्या लक्झरी नीड्स पूर्ण झाल्या तरी त्याचं समाधान होत नाही. लक्झरी दुप्पट-चौपट अशा वाढत जातात. मल्टिप्लाय होत राहतात. इच्छांना अंत नसतो. गरजांना अंत नसतो. आणखी हवं, आणखी हवं या हव्यासातून भ्रष्टाचाराचा जन्म होतो.

हव्यासाबरोबरच मोठेपणाची हौस भ्रष्ट आचरणाला निमंत्रण देते. समाजात स्थान मिळवण्यासाठी, ते टिकवण्यासाठी ते वाढवण्यासाठी माणूस धडपडत राहतो. मी संस्थापक आहे. माझ्या संस्थेला देणग्या हव्यात, माझ्या राजकीय पक्षाला देणग्या हव्यात, माझ्या ग्रुपला आर्थिक मदत हवी. संस्था, राजकीय पक्ष चालवण्यासाठी पैसा आवश्यक असतोच पण या संस्थांची, राजकीय पक्षांचीही भूक वाढतच जाते.




संस्थांच्या, राजकीय पक्षांच्या आधाराने माणसं मोठी होतात. संस्थांच्या पैशांच्या गरजेतूनही मग साखळी तयार होते. भ्रष्टाचार वाढतो आणि मग माणसं व संस्था भ्रष्टाचाराच्या गर्तेत सापडतात. अधिकाधिक रुतत जातात. माणसं व संस्था जेव्हा भ्रष्टाचाराच्या चौकटीत अडकतात तेव्हा माणसं म्हणतात, आम्ही संस्थेसाठी काम करत होतो, आमचा दोष काय? भ्रष्टाचारी माणूस अडकतो, तेव्हा त्याची स्थिती वाल्या कोळ्यासारखी होते. त्याने मिळवलेल्या काळ्या पैशांचा, भ्रष्टाचाराच्या पैशांचा

उपभोग त्यांचे कुटुंबीय घेतात, नातेवाईक घेतात, मित्र-हितचिंतक घेतात, त्याच्या संस्था घेतात. पण तो अडकतो तेव्हा कोणीही पुढे येत नाही. जी काही शिक्षा होते, ती त्याला एकट्याला भोगावी लागते. पण तेव्हा पश्चात्ताप होऊन काही उपयोग नसतो.


एका नावाजलेल्या बँकेच्या अध्यक्षांबरोबर सहज गप्पागोष्टी करत असताना भ्रष्टाचाराचा विषय निघाला होता, तेव्हा त्यांनी एक सुंदर उदाहरण दिलं होतं, घुशीचं. लाच देण्याला हिंदीमध्ये 'घूस देना' म्हणतात. त्या दिवशी मला 'घूस देना' शब्दाचं कोडं उलगडलं. घूस हा प्राणी आपल्याला माहीत आहे. घूस सतत माती उकरत असते. उकरत राहाणं हा तिचा स्थायीभाव. उकरता-उकरता दगड-मातीचा डोंगर उभा राहिला तरी त्याची तिला जाणीव नसते. ती उकरत राहते. मग कधीतरी तो डोंगर कोसळतो आणि त्याखाली घूस दबून जाते, चिरडली जाते. भ्रष्टाचारी माणसालाही घुशीसारखीच उकरायची, खणायची लत लागलेली असते, व्यसन जडलेलं असतं. भ्रष्टाचाराचा पैसा उकरत राहाणं हा भ्रष्टाचारी माणसाचा धंदा असतो. एक सात बारा देण्यासाठी एकाकडून पाच रुपये उकळले, तर दुसऱ्याकडून दहा रुपये कसे उकळता येतील याच्या विचारात तो असतो. वाहतुकीचा नियम मोडला म्हणून एका वाहनचालकाकडून शंभर रुपये उकळले तर दुसऱ्या वाहनचालकाकडून पाचशे रुपये कसे उकळता येतील, याच्या डावपेचामध्ये तो दंग असतो. एखादा परवाना देताना, एखादं मोठं कंत्राट मंजूर करताना हजारो-लाखो रुपये उकळण्याच्या मागे तो असतो, भ्रष्टाचाराचा डोंगर रचत जातो. असं करता करता हा डोंगर कधी कोसळतो हे त्यालाही कळत नाही. भ्रष्ट म्हणून समाज त्याची निंदा करतो, त्याच्या मोठेपणाचा फुगा फुटतो आणि मग जवळची माणसंही दूर जातात.

भ्रष्टाचाराचे अनेक पैलू आहेत. भ्रष्टाचार वेगवेगळ्या बाजूंनी, वेगवेगळ्या प्रकारे होत असतो. तो केवळ पैशांचाच असतो असं नाही तर तो वैचारिक असू शकतो. नीतिमत्तेचा भंग करणारा असू शकतो. काही माणसं वैचारिक भ्रष्टाचार करतात. काहीबाही सवंग विधानं करतात. स्वतःच्या स्वार्थासाठी एखाद्याच्या बदनामीची मोहीम उघडतात. एखाद्या समाजाबद्दल, एखाद्या प्रदेशाबद्दल विपर्यस्त विधानं करतात. एखादं काहीतरी पिल्लू सोडून देणं आणि नंतर मजा बघत बसणं, असे त्यांचे उद्योग असतात. असं एखादं पिल्लू सोडून दिलं तर लोक तहान-भूक विसरून त्याच प्रश्नाभोवती पिंगा धरतात आणि नाहक वाहवत जातात. या वैचारिक

भ्रष्टाचाराबद्दल मात्र फारशी चर्चा होत नाही. हा भ्रष्टाचार समाजाला घातक ठरतो, हे नक्की!

वैचारिक भ्रष्टाचाराप्रमाणेच घातक असतो नीतिमत्तेचा भंग करणारा भ्रष्टाचार. काही वर्षांपूर्वी मांढरदेवी येथे काळूबाईच्या जत्रेच्या वेळी झालेली दुर्घटना आठवा. त्यावेळी झालेल्या चेंगराचेंगरीत शेकडो माणसं दगावली. त्यात अनेक स्त्रिया होत्या. या अशा दुःखद, दुर्दैवी घटनेतही काही जणांनी महिलांच्या मृतदेहावरची वस्त्रं, दागिने लुटून नेले. वर्तमानपत्रात अशा बातम्या होत्या. हा माणुसकीचा कडेलोट होता. मृताच्या टाळूवरचं लोणी खाणं म्हणजे काय, ते यावेळी समाजाने पाहिलं. समाजातील नैतिकताच संपुष्टात आली आहे काय ? असा प्रश्न पडावा असं वर्तन राजरोसपणे घडताना दिसत आहे. स्वार्थासाठी दुधात भेसळ, अन्नधान्यात भेसळ केली जाते, पूल-रस्ते-इमारती बांधताना सिमेंटमध्ये भेसळ केली जाते. या भेसळीमुळे बांधकामं कोसळतात. अनेक लोक मृत्युमुखी पडतात. हा नीतिमत्तेचा भंग करणारा भ्रष्टाचार आहे. इंटरनेटवर बनावट अकाउंट उघडून अश्लील छायाचित्रं पाठवणं हे सुद्धा नैतिकतेच्या विरुद्ध वर्तन आहे. माणसाचं सामाजिक-सांस्कृतिक जीवन उद्ध्वस्त करणारा भ्रष्टाचार हा आर्थिक भ्रष्टाचाराइतकाच गंभीर आहे. मानवतेचा-नैतिकतेचा खून करणाऱ्यांनाही जरब बसेल अशी शिक्षा झाली पाहिजे.

जबाबदारी टाळणं, पूर्ण न करणं हा देखील एक प्रकारचा भ्रष्टाचार आहे, असं मला वाटतं. वेगवेगळ्या प्रकारची पदं आपल्याला हवी असतात, पण या पदांना आपण न्याय देतो का? मी कॉलेजमध्ये शिकत असताना होस्टेलमध्ये माझा एक रूम पार्टनर होता. तो ही नंतर तज्ज्ञ पशुवैद्य झाला. तो मला म्हणायचा, 'मला असा पशुवैद्यकीय दवाखाना मिळाला पाहिजे की, जिथे माझ्याकडे तपासण्यासाठी एकही जनावर आलं नाही पाहिजे.' याला मी जबाबदारीतला भ्रष्टाचार म्हणतो. मला पद पाहिजे, पदाचे सर्व हक्क पाहिजेत, सर्व सुविधा पाहिजेत पण पदाची जबाबदारी नको, काम नको! हा भ्रष्टाचार अनेकजण करत असतात, पण त्यासाठी काहीच शिक्षा नसते. आपल्याकडे एकूणच उत्तरदायित्वाचा अभाव दिसून येतो. त्यामुळे कामं दीर्घकाळ प्रलंबित राहतात. त्यामुळे शासनाचं, समाजाचं, लोकांचं नुकसान होतं, पण स्वतःच्या मौजेसाठी पद सांभाळणाऱ्यांना त्याचं सोयरसुतक नसते. न्याय प्रक्रियेतला विलंब हा सुद्धा एक प्रकारचा भ्रष्टाचारच आहे. न्यायाला विलंब




म्हणजे न्यायाला नकार, असं म्हटलं जातं. न्यायालयात लाखो खटले पडून आहेत. ते सर्व निकाली काढायचे असतील तर पंचवीस-तीस वर्षं लागतील, असं सांगितलं जातं. न्याय्य मार्गाने प्रश्न सुटण्यास दिरंगाई होत असेल तर माणूस चुकीच्या मार्गाने जाण्याचा प्रयत्न करतो. यातून भ्रष्टाचाराला तोंड फुटतं.

मानवी जीवनातील अशी काही क्षेत्रं आहेत, जी पवित्र मानली जातात. उदाहरणार्थ, आध्यात्मिक क्षेत्र, शिक्षण क्षेत्र, वैद्यकीय क्षेत्र. भ्रष्टाचाराच्या फेऱ्यातून ही क्षेत्रं सुद्धा सुटलेली नाहीत. धार्मिक-अध्यात्मिक क्षेत्रात लोकांच्या श्रद्धांचा, धार्मिक भावनांचा स्वतःच्या स्वार्थासाठी वापर करणाऱ्यांचा सुकाळ झाला आहे, असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. कोणी स्वतःला अवतार समजून घेतं तर कोणी स्वतःभोवती अध्यात्मिक गुरूचं वलय निर्माण करतं. भक्तांच्या रांगा आपल्या अध्यात्मिक दुकानांसमोर कशा वाढतील, यासाठी त्यांच्यात स्पर्धा लागते. मनःशांती, आत्मिक समाधानाच्या पाट्या लावून ही दुकानं चालवली जातात. अनेक बाबा-बुवांची बिंग फुटली तरी दररोज एक नवा बाबा जन्माला येतो. लोकांच्या श्रद्धेवर डल्ला मारणं हा सुद्धा भ्रष्टाचार आहे.

शैक्षणिक क्षेत्रातल्या भ्रष्टाचाराच्या कहाण्या आपल्याला नव्या नाहीत. प्रवेशासाठी वजनदार डोनेशन घेणं, वेगवेगळ्या नावांखाली पैशांसाठी विद्यार्थ्यांना वेठीला धरणं, मान्यता नसताना अभ्यासक्रम चालवणं, पैशांच्या मोबदल्यात खोट्या पदव्या, सर्टीफिकेट बहाल करणं, मजकुराच्या इकडून-तिकडून चोऱ्या करून पीएच.डी.चे प्रबंध दाखल करणं... एक ना अनेक तऱ्हा! भावी पिढी घडवणाऱ्या शिक्षण क्षेत्रातला भ्रष्टाचार ही चिंतादायक बाब बनली आहे. विषयाचं परिपूर्ण ज्ञान नसलेले लोक शिक्षक-प्राध्यापक बनतात आणि केवळ पाट्या टाकायचं काम करतात. विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या नुकसानीची त्यांना फिकीर नसते. खेळाच्या क्षेत्रातही

मॅच फिक्सिंग, स्पॉट फिक्सिंग जोरात चालत आहे. थोडक्यात, समाजाला सर्व बाजूंनी भ्रष्टाचाराने वेढले आहे. तो समाजात, व्यक्तीच्या तना-मनात शिरलेला आहे. याचा निःपात कसा करायचा? याला गाडून कसं टाकायचं?

हा प्रश्न अवघड आहे, असं प्रत्येकाचंच मत बनत चाललेलं आहे; पण या प्रश्नावर एकच उत्तर असू शकतं, ते म्हणजे, संस्कार! माणसामध्ये भ्रष्टाचाराची जी काही मानसिकता आहे, त्यावर आपण संस्काररूपी आवरण घालून तिला दाबून टाकलं पाहिजे. भ्रष्टाचार हा मनाचा विस्फोट आहे; आणि तो संस्कारांनीच शांत होऊ शकतो. चांगल्या वर्तनाचे संस्कार मनात खोलवर रुतले पाहिजेत, म्हणजे भ्रष्ट आचरणाचा विचार सुद्धा मनात येणार नाही. एखादा गरीब रिक्षाचालक प्रवाशाची रिक्षात विसरलेली चार-पाच लाख रुपयांनी भरलेली बॅग प्रवाशाला शोधून काढून परत देतो किंवा पोलिसांच्या हवाली करतो. अशी उदाहरणं आपण ऐकतो, वाचतो, पाहतो, अनुभवतो. अशी उदाहरणं म्हणजे आश्चर्य वाटावं अशीच गोष्ट असते. समजा त्या रिक्षाचालकाने ती बॅग परत न करता स्वतःकडेच ठेवली असती, त्यातील पैसे खिशात घातले असते, तर त्याला विचारणारं कोण होतं? चुकून प्रवाशाने त्याला शोधून काढलं असतं, तर अशी कोणती बॅग माझ्या रिक्षात विसरलीच नाही, असं म्हणत त्याला हात वर करता आले असते; पण स्वतः गरीब असूनही, पैशांची गरज असूनही तो सचोटीने वागतो, प्रामाणिकपणे पैसे परत करतो. काहीजण या प्रामाणिकपणाबद्दल देऊ केलेलं बक्षीसही स्वीकारत नाहीत. ते आपलं कर्तव्य होतं, असं म्हणतात. माणसांत हे चांगुलपण-मोठेपण येतं कुठून? अर्थातच संस्कारांमधून. एकीकडे ही अशी उदाहरणं, तर दुसरीकडे खाणारी माणसं नुसतं खात राहतात. ही संस्कारच न झाल्याची किंवा चुकीचे संस्कार झाल्याची परिणती!

लहानपणी आम्हालाही वाटायचं, आमच्या घरात बेसिन असावं, डायनिंग टेबल असावं, अमुक असावं, तमुक असावं, आम्हालाही वाटायचं असं करावं, तसं करावं पण आमचे वडील सांगायचे, 'तुमच्या गरजा कमी करा. तुमच्याजवळ जे आहे, त्यातच आंनद माना.' मला मिळालेली चतकोर भाकरी मी आनंदाने खात नाही, तर पूर्ण भाकरीची अपेक्षा करतो आणि ती अपेक्षा पूर्ण न झाल्याचं दुःख बाळगतो. त्या दुःखातच मी गुरफटून जातो. त्यामुळे मिळालेल्या चतकोर भाकरीचा आनंद-समाधान मी घेऊ शकत नाही. माणसाने गरजा कमी केल्या तर परिस्थितीत एकशे एक टक्के फरक पडू शकतो. सगळ्या माणसांनी दररोज चालत जायचं ठरवलं,

तर कितीतरी गरजा कमी होतील. माझ्याकडे मारुती कार आहे, त्याच्याकडे बीएमडब्ल्यू आहे, त्याच्याकडे मर्सिडीझ आहे अशी स्पर्धाच उरणार नाही. चालत जाणं ही कदाचित अतिशयोक्ती होईल, पण प्रत्येकाने सार्वजनिक वाहतुकीचा वापर करायचं ठरवलं, तरीही हा हव्यास कमी होऊ शकेल, स्पर्धा कमी होऊ शकेल. आपल्या गरजा आपण कमी केल्या तर हव्यासापासून, मोहांपासून आपण परावृत्त होऊ शकतो हे सगळ्यात महत्त्वाचं आहे.

माझं जे काही आहे, ते कायमच माझं असणार नाही; कारण मला अंत आहे, मृत्यू आहे. हा विचार माणसाने करायला हवा. आपण जे काही कमावतो त्याकडे विश्वस्त वृत्तीने पाहायला हवं. हे पुढच्या पिढीला स्वाधीन करायचं आहे. त्यासाठी त्याचं रक्षण करायचं आहे. पावसाच्या चक्राप्रमाणे पैशाचं चक्रही निरंतर फिरत राहीलं पाहिजे. पैशाचं सर्व समाजात समान वाटप झालं पाहिजे, ही भावना निर्माण होणं गरजेचं आहे. देणं ही सुद्धा दैवी देणगी आहे. माणसामध्ये दातृत्व वृत्ती असायला हवी. हा दातृत्वाचा विचार माणसाला स्वार्थाच्या पलीकडे घेऊन जातो. हा विचार समाजात जेवढ्या प्रमाणात रुजेल, तेवढा भ्रष्टाचार नक्कीच कमी होऊ शकेल.

समाजात चित्रं असं दिसतं की, भ्रष्टाचारी माणूस रस्त्यावरून राजरोसपणे हिंडत आहे. त्याला काहीच शिक्षा होत नाही. भ्रष्टाचार करणारे नेते तुरुंगातून निर्दोष सुटतात आणि त्यांचे कार्यकर्ते जणू स्वातंत्र्यसैनिक असल्याच्या थाटात त्यांची मिरवणूक काढतात, हारतुरे घालतात. यातून समाजात चुकीचा संदेश जातो. भ्रष्टाचार हाच शिष्टाचार बनतो. समाजावर कायद्याचा धाक रहात नाही. या ना त्या प्रकारे सारेच भ्रष्टाचार करू लागतात. निवडणुकीत लोक उमेदवारांकडे पैसे मागतात, त्यांच्याकडून स्वतःची, सोसायटीची, वसाहतीची कामं करवून घेतात. लोकच जेव्हा असा भ्रष्टाचार करू लागतात, तेव्हा नेत्याने भ्रष्टाचार करू नये अशी अपेक्षा ठेवण्यात काय हशील? आपण सिग्नल तोडायचा, नो एन्ट्रीत घुसायचं आणि पोलिसाने अडवलं की त्याच्या हातात शंभराची नोट कोंबायची. यात भ्रष्टाचारी कोण? आपण की पोलीस? त्यामुळे भ्रष्टाचाऱ्याकडे एक बोट दाखवताना तीन बोटे आपल्याकडेही वळतात, हे लक्षात घेतलं पाहिजे आणि भ्रष्टाचार संपवण्याची सुरुवात स्वतःपासून केली पाहिजे.

भ्रष्टाचाऱ्याला कठोर शिक्षा होणं हा भ्रष्टाचाराला लगाम घालण्याचा एक



मार्ग आहे. एखादा अधिकारी किंवा कर्मचारी भ्रष्टाचारी असेल तर त्याला त्याच्या ऑफिसच्या बाहेरच पिंजऱ्यात बंद करून ठेवलं पाहिजे. जेणेकरून इतर अधिकारी व कर्मचारी यांच्या तो दृष्टीस पडेल. आपण भ्रष्टाचार केला तर आपली गत अशीच होईल हा धाक त्यांच्या मनात निर्माण होईल व ते सरळ मार्गाने चालू लागतील. येणारे-जाणारे पिजंऱ्यातल्या भ्रष्टाचाऱ्याला पाहतील, त्याला नावं ठेवतील, त्याची निंदा करतील. भ्रष्टाचाऱ्याची मान शरमेने खाली जाईल आणि पुन्हा असं वर्तन न करण्याची शपथ तो घेईल. भेसळ करणाऱ्यांना तर शेण खायला घालण्याची शिक्षा दिली पाहिजे. कदाचित मानवतावाद्यांना, मानवी हक्कांच्या रक्षकांना शिक्षेचा हा प्रकार आवडणार नाही, पण असे कठोर उपाय अवलंबण्याखेरीज भ्रष्टाचाऱ्यांना जरब बसणार नाही. हे तितकंच खरं! आज जे कायदे प्रचलित आहेत, त्यांच्यातही भ्रष्टाचाऱ्यांना जरब बसवण्याची क्षमता आहे. भ्रष्टाचाऱ्यांवर वेगाने खटले चालवून अल्प कालावधीत जरी शिक्षा ठोठावण्यात आल्या तरी भ्रष्टाचाराला आळा बसू शकतो. न्याय प्रक्रियेतील दिरंगाई कायद्याचा धाक कमी करते, हे लक्षात घेतलं पाहिजे.

भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमध्ये बऱ्याचदा खालच्या स्तरावरच्या कर्मचाऱ्यांना शिक्षा होताना दिसतात, पण वरच्या स्तरावरचे अधिकारी मात्र सुटताना दिसतात. वास्तविक, प्रामाणिकपणा, सचोटी, बांधिलकी, समर्पितता हे चांगले गुण असोत, की दिरंगाई, कामचुकारपणा, हलगर्जीपणा व भ्रष्टाचार हे वाईट गुण असोत, ते नेहमी वरून खाली झिरपतात, वरच्या स्तरावरच्या लोकांचं वर्तन भ्रष्टाचाराला कारणीभूत ठरतं, त्यामुळे वरच्या स्तरावरच्या लोकांना कठोर शिक्षा झाल्या तर खालच्या स्तरावरच्या कर्मचाऱ्यांना आपोआपच जरब बसेल. भ्रष्टाचाराबद्दल फौजदाराला शिक्षा झाली तर शिपाई चिरीमिरी घ्यायला सुद्धा कचरेल!

आज भ्रष्टाचाराचं रान जरी माजलेलं असलं, तरी सगळेच भ्रष्टाचारी आहेत, असं कोणी म्हणणार नाही. प्रत्येक ठिकाणी काही चांगली माणसंही आहेत आणि या चांगल्या माणसांमुळे व्यवस्था टिकून आहे, असं म्हणावं लागेल. अण्णा हजारे यांनी आंदोलन पुकारलं तेव्हा त्यांना पाठिंबा देण्यासाठी हजारो लोक पुढे आले, त्यात अनेक माजी सनदी अधिकारी, सरकारी कर्मचारी होते, हे विसरून चालणार

नाही. अण्णा हजारे यांनी चालवलेल्या जनजागृतीचा चांगला परिणाम नक्कीच होईल.

आपण म्हणतो, रामराज्यं आलं पाहिजे. हे रामराज्यं केव्हा येईल? अर्थातच 'राम' आल्याशिवाय रामराज्य येणार नाही! याचा अर्थ हाच की, नैतिकदृष्ट्या चांगलं नेतृत्व आल्याशिवाय, वरच्या स्तरावर चांगले लोक आल्याशिवाय भ्रष्टाचार निर्मूलन होणार नाही. लोकशाहीत असं जबाबदार नेतृत्व आणण्याची जबाबदारी लोकांवरच असते, हे विसरून चालणार नाही. घरात डास-ढेकूण झाले की आपण काय करतो? कीटकनाशकांची फवारणी करून त्यांचं निर्मूलन करतो. भ्रष्टाचाराला डास मानून त्याचंही आपण निर्मूलन केलं पाहिजे. भ्रष्टाचाऱ्याला आपल्या डोक्यावर बसवून न घेण्याची काळजी आपणच घेतली पाहिजे. या डासाला डोक्यावरून उतरवण्याचा निर्धार केला तर भ्रष्टाचार निर्मूलनाच्या दिशेने एक पाऊल पुढे पडेल.